दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

शेतात तरुणाला सर्पदंश

कन्नड : दि.२६ ऑक्टोबर - शेतात काम करत असताना दि.२६ सोमवार रोजी सायंकाळी पायाला सर्पदंश झाल्याने भांबरवाडी येथील २० वर्षीय तरुणाला पुढील उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. सतीश संजय राठोड असे तरुणाचे नाव आहे. सतीश राठोड हे शेतात काम करत असताना त्यांच्या पायाला सर्पदंश झाला. त्यानंतर त्यांना तातडीने कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. रुकसार खान यांनी त्यांची तपासणी केली. प्राथमिक तपासणीनंतर पुढील उपचारांसाठी त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गायी पकडल्या

अहिल्यानगर : कत्तलीसाठी दाटीवाटीने व अमानुषपणे डांबून नेल्या जाणाऱ्या दोन गायींना शहरातील नेप्ती नाका कल्याण रोड परिसरात तोफखाना पोलिसांनी कारवाई करत मुक्त केले आहे. या प्रकरणी वाहन चालकासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास डायल ११२ या आपत्कालीन यंत्रणेवर मिळालेल्या माहितीनुसार, नेप्ती नाका येथे एका पिकअप वाहनातून जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याचे समजले.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २७ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १८४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

आयडीएफसी फर्स्ट बँकेला 1,045 कोटींचा नफा

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीचे लेखापरीक्षण न केलेले आर्थिक निकाल जाहीर केले. बँकेने आर्थिक वर्ष 2026-27 च्या दुसऱ्या तिमाहीत रु 1,045 कोटींचा निव्वळ नफा (पीएटी) नोंदवला. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत नफ्यात 196.5% वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या सहामाहीत बँकेचा करपश्चात नफा रु 2,120 कोटी इतका राहिला, तर मालमत्तेवरील परतावा (आरओए) 0.99% नोंदवण्यात आला. निकालांवर भाष्य करताना, बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, "आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीत सलग दुसऱ्यांदा आमचा निव्वळ नफा (पीएटी) रु1,000 कोटींच्या पुढे गेला आहे. तसेच, एस अँड पी ग्लोबल रेटिंग्स या आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थेकडून इन्व्हेस्टमेंट-ग्रेड मिळाल्यामुळे आता आम्हाला आंतरराष्ट्रीय पतमानांकनही प्राप्त झाले आहे. सलग दुसऱ्या तिमाहीत आमच्या ओपेक्स खर्चातील वाढ ही उत्पन्नातील वाढीपेक्षा सुमारे 500 बेसिस पॉइंट्सने कमी राहिली आहे.

आयएनएस मंगरोल नौदलात दाखल

मुंबई,: भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या प्रयत्नांदरम्यान, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया ने देशाच्या नौदल आधुनिकीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय नौदलाच्या माहे-क्लासमधील तिसऱ्या अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट आयएनएस मंगरोलला नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले आहे.एएम/एनएस इंडियाने पुरवलेल्या 100% विशेष स्टीलपासून तयार करण्यात आलेल्या आयएनएस मंगरोलला 12 ऑक्टोबर 2026 रोजी मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले. ही उपलब्धी भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राला आणि सागरी सुरक्षेला बळकटी देण्यात प्रगत भारतीय स्टील उत्पादनाचे वाढते योगदान अधोरेखित करते.

हिबा नवाब साकारणार एक लाडकी चेटकीण

सोनी सब आपल्या आगामी कौटुंबिक सिटकॉम चुडैल चली ससुराल द्वारे प्रेक्षकांसाठी हास्य, प्रेम आणि जादुई गोंधळाचा मनोरंजक संगम घेऊन येण्यास सज्ज आहे. ही मालिका लोकप्रिय कथेला भारतीय अंदाजात नव्या स्वरूपात सादर करत असून, दैनंदिन कौटुंबिक क्षणांना कल्पनारम्य जादूची जोड देते. या मोहक कथेच्या केंद्रस्थानी अभिनेत्री हिबा नवाब असून, ती उर्वशीची भूमिका साकारणार आहे. जादुई दुनियेतील तिचा प्रवास वैवाहिक आयुष्यापर्यंत पोहोचताना अनेक मनोरंजक घडामोडी घडवून आणणार असून, प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करणार आहे.

आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर केली

मुंबई: दिवाळी म्हणजे रोषणाई, एकत्र येणे आणि प्रत्येक क्षण खास बनवणाऱ्या माणसांचा उत्सव. दिवाळीमध्ये विचारपूर्वक निवडलेली भेटवस्तू प्रेम, कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याचे माध्यम बनते. यंदा दिवाळीत शॉपर्स स्टॉप या भारतातील प्रीमियम फॅशन, ब्युटी आणि भेटवस्तूंच्या आघाडीच्या गंतव्याने 'गिफ्ट्स ऑफ लव्ह'च्या माध्यमातून भेटवस्तू देण्याच्या आनंदाला अधिक उत्साहवर्धक केले आहे. हे खास सणासुदीच्या भेटवस्तूंचे कलेक्शन आहे, जे या सणाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या अनेक नात्यांना साजरे करते.

पदवीधरांचा कौल कुणाला? आज मतपेट्यांतून उलगडणार राजकीय गणित!

सतीश चव्हाण, प्रतापसिंह पाटील की दिलीप घुगे? निकालाकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीतील उत्कंठा आता शिगेला पोहोचली आहे. उद्या, २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीत पदवीधर मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने लागतो, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. विद्यमान आमदार सतीश चव्हाण, प्रतापसिंह पाटील आणि दिलीप घुगे यांच्यासह अन्य उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला मतमोजणीतून होणार असल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.

मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज असून छत्रपती संभाजीनगरमधील चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. ही प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणेने आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी २६ ऑक्टोबर रोजी मतमोजणी केंद्राला भेट देऊन तयारीचा आढावा घेतला. मतमोजणी कक्षातील व्यवस्था, स्ट्रॉंग रूमची सुरक्षितता, मतपेट्यांचे संरक्षण, अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि सुरक्षा व्यवस्थेची त्यांनी पाहणी केली.

७० टेबलांवर मतमोजणी; १३ फेऱ्यांचे नियोजन असून मतमोजणीसाठी एकूण ७० टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्राथमिक मतमोजणीच्या १३ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक टेबलवर एक पर्यवेक्षक आणि दोन सहाय्यक नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक सात टेबलांच्या कामकाजावर एका सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नियंत्रण राहणार आहे.

टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी स्वतंत्र दोन टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतपत्रिकांचे वर्गीकरण, वैध-अवैध मतांचा निर्णय आणि पसंतीक्रमानुसार मतांची नोंद या प्रक्रियेत विशेष दक्षता घेतली जाणार आहे. निकालपत्रकांची पडताळणीही नियमानुसार करण्यात येईल.

मतमोजणी केंद्रावर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख, प्रवेशावर नियंत्रण आणि आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांना अधिकृत माहिती देण्यासाठी स्वतंत्र पथक नियुक्त करण्यात आले आहे.

मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत.

सतीश चव्हाण आपले राजकीय वर्चस्व कायम राखणार, प्रतापसिंह पाटील बाजी मारणार की दिलीप घुगे यांच्या रूपाने निकालात अनपेक्षित वळण मिळणार, याची उत्सुकता वाढली आहे. मात्र, या राजकीय चर्चांना पूर्णविराम देत मतदारांनी नेमका कोणाच्या बाजूने कौल दिला आहे, हे मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अजिंठा घाटात लक्झरी बस आणि ट्रकची भीषण धडक 52 प्रवासी सुखरूप मात्र 14-15 तास ट्रॅफिक जाममुळे पर्यटकांचे हाल

फर्दापूर प्रतिनिधी : जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरातील अजिंठा घाटात घाट चढत असताना लक्झरी बस आणि सळई वाहून नेणाऱ्या अवजड ट्रकमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास घडलेल्या या अपघातात राजस्थानमधील जयपूर येथील जैन समाजाचे ४९ प्रवासी तसेच बसमधील तीन चालक व सहकारी असे एकूण ५२ जण सुदैवाने बचावले या अपघातात काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असून मोठी जीवितहानी टळली आहे

वळणावर ओव्हरटेकचा प्रयत्न ठरला धोकादायक

मिळालेल्या माहितीनुसार जयपूर येथील जैन समाजाचे ४९ प्रवासी लक्झरी बसने RJ 14 PG 1640 शिर्डीकडे प्रवास करत होते अजिंठा घाट चढत असताना बसचालकाने पुढील वाहनाला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला त्याचवेळी समोरून सळई घेऊन येणारा अवजड ट्रक MH 21



BH 2797 समोर आल्याने दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले

अजिंठा पोलिसांची तत्परता

अपघाताची माहिती मिळताच अजिंठा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक पवन इंगळे पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर यांच्यासह जाफर पठाण संतोष पाईकराव मंगेश आरके विजय पवार जमील तडवी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत मेकॅनिकला बोलावून लक्झरी बसची दुरुस्ती करून घेतली आणि प्रवाशांच्या पुढील प्रवासाचा प्रश्न मार्गी लावला

अजिंठा घाटात झालेला हा या महिन्यात सहावा अपघात असल्याची माहिती समोर येत आहे मात्र या अपघातानंतर घाटामध्ये तब्बल १४ ते १५ तास ट्रॅफिक जाम झाल्यामुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला काही बेशिस्त वाहनचालकांनी वाहतूकशिस्त न पाळता पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने कोंडीत आणखी भर पडली या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे अजिंठा लेणी पाहण्यासाठी दूरवरून आलेले अनेक पर्यटक लेणी न बघताच घाटातून आणि फत्तेपूर किंवा सोयगाव मार्गावरून परत निघून गेले

जिल्हाधिकाऱ्यांचे अजिंठा लेणीकडे दुर्लक्ष का

अजिंठा घाटात वारंवार होणारे अपघात आणि तासनतास होणाऱ्या ट्रॅफिक जाममुळे जागतिक पर्यटन स्थळाची नाचक्की होत आहे अशा प्रकारच्या बातम्या आणि वस्तुस्थिती दर्शवणारे वृत्तपेपर कात्रण जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत का आणि जर पोहोचत असतील तर मग प्रशासनाचे आणि जिल्हाधिकाऱ्यांचे अजिंठा घाटातील वाहतूक व सुरक्षेच्या प्रश्नांकडे एवढे दुर्लक्ष का आहे असा संतप्त सवाल आता स्थानिकांमधून आणि पर्यटनप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे घाटातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि वारंवार होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी अशी तीव्र मागणी होत आहे

मुंबईत आठवड्यातून एक दिवस बांधकामे बंद ठेवा

मंत्री आशिष शेलार यांची महापालिका आयुक्तांना सूचना

मुंबई : मुंबईतील वाढत्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी संपूर्ण मुंबई महापालिका क्षेत्रात आठवड्यातून एक दिवस सर्व बांधकामे आणि पाडकामे बंद ठेवावीत, अशी सूचना सांस्कृतिक कार्यमंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्राद्वारे केली आहे. हिवाळ्यात प्रदूषणाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन तातडीच्या उपाययोजनांसह दीर्घकालीन कृती आराखडा राबविण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मुंबईतील हवेच्या खालावत्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून निवेदने प्राप्त झाली असून, मुंबई उच्च न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांचे स्वागत करताना, २०१७-१८ पासून पीएम-१० प्रदूषणाच्या पातळीत सुमारे ४८ टक्क्यांनी घट झाल्याचे शेलार यांनी नमूद केले. मात्र, प्रदूषणावर प्रभावी नियंत्रणासाठी आणखी व्यापक उपायांची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले मुंबईसाठी स्वतंत्र श्रेणीबद्ध कृती आराखडा तयार करून हवेची गुणवत्ता खालावताच पूर्वनिश्चित उपाययोजना लागू कराव्यात, असे त्यांनी सुचविले आहे. प्रदूषणग्रस्त भाग आणि प्रमुख वाहतूक मार्गांवर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याने रस्ते धुणे, पाण्याची फवारणी करणे, रात्री यांत्रिक पद्धतीने रस्ते स्वच्छ करणे, खड्डे तातडीने बुजविणे आणि खोदकामानंतर रस्ते वेळेत पूर्ववत करणे, यावर त्यांनी भर दिला आहे. कचरा जाळणे, कचरा डेपोतील आगी आणि बांधकामाचा राडारोडा बेकायदेशीरपणे टाकण्याच्या घटनांची तक्रार करण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन व समाजमाध्यम खाते सुरू करावे. तक्रारींवर तातडीने कारवाई करून दोषींना दंड करावा आणि कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल प्रसिद्ध करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या जमिनीच्या हस्तांतरणावरील 25 टक्के शुल्क माफ : चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : राज्यातील सौर आणि पवन ऊर्जेसारख्या नवीन ऊर्जा प्रकल्पांना चालना देण्यासाठी जमिनीच्या अंतर्गत हस्तांतरणावर आकारले जाणारे 25 टक्के शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मुख्य कंपनीकडून त्याच कंपनीच्या विशिष्ट प्रकल्पासाठी स्थापन केलेल्या उपकंपनीकडे जमीन हस्तांतरित करताना ही सवलत लागू होणार आहे. त्यामुळे ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीतील अतिरिक्त आर्थिक भार कमी होऊन गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायद्यांतर्गत औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेल्या जमिनीचे हस्तांतरण करताना रेडी रेकनरनुसार निर्धारित बाजारमूल्याच्या 25 टक्के शुल्क जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करावे लागत होते. नवीन ऊर्जा प्रकल्प उभारताना बँकांकडून कर्ज मिळविणे किंवा परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे यांसारख्या कारणांसाठी मुख्य कंपनीला संबंधित जमीन स्वतंत्र उपकंपनीच्या नावावर करावी लागते. अशा वेळी कंपनीची मालकी कायम असतानाही केवळ अंतर्गत आणि कागदोपत्री हस्तांतरणासाठी मोठे शुल्क भरावे लागत होते. त्यामुळे प्रकल्पांच्या खर्चात वाढ होऊन ऊर्जा निर्मितीच्या कामांना विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर 18 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार हस्तांतरण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सवलतीमुळे प्रकल्पांसाठी जमीन उपकंपनीच्या नावावर करताना कंपन्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. परिणामी, प्रकल्प खर्चात बचत होऊन नवीन ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

सवलतीसाठी जमिनीच्या वापराची अट शुल्कमाफीचा लाभ घेतलेल्या जमिनीचा अंतिम वापर फक्त नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठीच करणे बंधनकारक राहणार आहे. संबंधित कंपनीने ही जमीन नंतर निवासी, व्यावसायिक किंवा अन्य कारणासाठी वापरल्यास अथवा तृतीय पक्षाला विकल्यास शुल्कमाफी रद्द केली जाईल. अशा परिस्थितीत हस्तांतरण शुल्काची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्यात येणार आहे. त्यामुळे शुल्कमाफीचा लाभ निर्धारित उद्देशासाठीच वापरला जाईल, याची खबरदारी शासनाने घेतली आहे.

अशी पार पडणार पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी प्रक्रिया

70 टेबलांवर प्राथमिक मतमोजणीच्या 13 फेऱ्या; सकाळी 8 वाजता प्रारंभ

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी उद्या, मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे होणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. प्राथमिक मतमोजणीसाठी ७० टेबलांवर १३ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी विभागातील आठ जिल्ह्यांमधील ८४२ मतदान केंद्रांवर मतदान झाले. प्राथमिक आकडेवारीनुसार १ लाख ९१ हजार ६८९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, मतदानाची टक्केवारी ५८.६७ आहे. निवडणुकीत एकूण ४१ उमेदवार रिंगणात आहेत.

मतमोजणीची सुरुवात कशी होणार?

मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी सकाळी ७ ते ७.१५ या वेळेत मतमोजणी



कक्षात उपस्थित राहतील. सकाळी ७.३० वाजता उमेदवार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्रॉंग रूम उघडण्यात येईल. त्यानंतर मतपेट्यांचे टेबलनिहाय वितरण होईल. सकाळी ८ वाजता गोपनीयतेची शपथ घेतल्यानंतर प्रत्यक्ष मतमोजणी सुरू होईल. त्याच वेळी टपाली मतपत्रिकांची मोजणीही सुरू करण्यात येईल.

प्रथम मतपत्रिकांचे गठ्ठे तयार होणार

प्रत्येक मतपेटीवरील सील तपासून ती उमेदवारांच्या प्रतिनिधींसमक्ष उघडली जाईल. मतपेटीतील मतपत्रिकांची संख्या तपासून मतदान केंद्राच्या हिशेबाशी पडताळणी केली जाईल. त्यानंतर प्रत्येकी २५ मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करण्यात येतील.

सर्व मतपत्रिकांचे गठ्ठे एकत्रित करून त्यांची सरमिसळ केली जाईल. त्यानंतर प्रत्येक टेबलवर एक हजार मतपत्रिका तपशीलवार मतमोजणीसाठी दिल्या जातील. ८४२ मतदान केंद्रांवरील मतपेट्यांच्या प्राथमिक मोजणीसाठी १३ फेऱ्या होणार असून, तेराव्या फेरीत केवळ दोन मतदान केंद्रांतील मतपेट्यांची मोजणी होईल.

पसंतीक्रमानुसार मतांची मोजणी

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पसंतीक्रम पद्धतीने होत असल्यामुळे प्रथम प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या पहिल्या पसंतीच्या वैध मतांची मोजणी केली जाईल. त्यानंतर एकूण वैध मतांच्या आधारे निवडून येण्यासाठी आवश्यक मतांचा कोटा निश्चित केला जाईल.

पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराने आवश्यक कोटा पूर्ण केला नाही, तर सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला नियमानुसार वगळण्यात येईल. त्या उमेदवाराच्या मतपत्रिकांवरील पुढील उपलब्ध पसंतीक्रमानुसार उर्वरित उमेदवारांना मतांचे हस्तांतरण केले जाईल. आवश्यक कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा नियमानुसार निर्णय होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील.

पसंतीक्रमानुसार मतांची मोजणी व हस्तांतरण करावे लागत असल्याने अंतिम निकालासाठी अतिरिक्त वेळ लागू शकतो. मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आवश्यक पडताळणी व निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

"शाल जोडे"



बाबा टॉवर शॉपिंग कॉम्प्लेक्स चे अनधिकृत बांधकाम एक महिन्यात हटविण्याचे आदेश

3620 चौरस मीटर बांधकामाचा समावेश.; पाथरी नगर परिषदेची भागीदारी संस्थेला नोटीस

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी**शहरातील बाबा टावर आणि शॉपिंग कॉम्प्लेक्स च्या अनधिकृत बांधकाम प्रकरणी पाथरी नगर परिषदेने संबंधित भागीदारी संस्थेला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 53 अन्वये 22 ऑक्टोबर गुरुवार रोजी ही नोटीस बजावली आहे नोटीस मिळाल्यापासून एक महिन्यातच अनधिकृत बांधकाम स्वतःच्या खर्चाने हटवून जागा पूर्वत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अधिक माहिती अशी की नगरपरिषदेच्या 22 जानेवारी 2020 च्या रोजीच्या नोटीसित जिल्हाधिकारी परभणी यांच्या १२ ऑक्टोबरच्या पत्रासह शासन विभागीय आयुक्त संचालक नगर रचना आणि अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या चौकशी समितीच्या अहवालाचा संदर्भ देण्यात आला आहे ही चौकशी अहवालानुसार 2004 मध्ये मंजूर सुधारित रेखांकन तात्कालीन विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक असलेल्या दहा टक्के खुलली जागा म्हणजेच 960.5 चौरस मीटर क्षेत्र सोडवण्यात आले नाही म्हणून स्थळ पाहणी आणि कायदेशीर प्रक्रिया न पाळतात मंजुरी दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे तसेच 13 मे 2013 रोजी सुधारित बांधकाम परवानगी देताना जमिनीची मोजणी व आवश्यक कायदेशीर पडताळणी झाली नसल्याचा आक्षेपही घेण्यात आला आहे मूळ रेखांकन रहिवासी वापरासाठी असताना व्यवसायिक वापरासाठी सुधारित परवानगी घेतल्याचे अहवालात नमूद केलेले आहे तात्कालीन नगराध्यक्ष जुनेद खान दुरानी यांच्या कार्यकाळातील ठराव आणि संबंधित मालमत्ते तील हित संबंधित संबंधाबाबतही आक्षेप



नोंदविण्यात आला आहे.

यामध्ये शुभम जनरल स्टोअर व सम्राट कलेक्शनच्या पायऱ्याचे ओटे इमारत रेषेत येत असल्याचे तसेच नऊ आर क्षेत्रातील पंधरा दुकानांचे बांधकाम इमारत व नियंत्रण रेषेत असल्याचे आणि आवश्यक परवानगी नसल्याचे अहवालात म्हटले आहे मंजूर नकाशाचे उल्लंघन हा सामाजिक अंतर इन सोडवण्याचाही ठपका आहे माळीवाडा येथील सर्वे क्रमांक नऊ ऑब्लिक एक मधील 3.427.22 चौरस मीटर भूखंडावर 3.620.91 चौरस मीटर क्षेत्राचे आरसीसी व्यावसायिक बांधकाम असल्याचे नोटिषद म्हणून नमूद करण्यात आले आहे संबंधित संस्थेने महिनाभरात बांधकामना हटवल्यास नगरपरिषद स्वतः कारवाई करून खर्च वसूल करणार आहे व त्यामुळे या प्रकरणातील पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यात प्रकरणाशी संबंधित नगरपरिषदेचे स्वीकरत नगरसेवक बाबाजानी दुरानी आणि त्यांचे नगरसेविका शाहिस्ता बेगम दुरांनी यांच्या सत्वा बाबत जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी 22 ऑक्टोबर रोजी सुनावणीची नोटीस बजावली आहे पात्री येथील माळीवाडा परिसरात गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा सेवा रस्ता आणि 15 दुकानाच्या बांधकाम परवानगीतील कथित अनियमितेसह सुधारित अभि न्यासाच्या वैधतेबाबत नगरसेवक गोविंद हरकळ आणि इतर दोघांनी तक्रार केली आहे या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमातील कलम 44/1/e /नुसार अपात्रतेची मागणी करण्यात आली आहे याप्रकरणी 5 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

दुष्काळ, कर्जवसुलीची सक्ती

महाराष्ट्रातील ३०५ तालुक्यांमध्ये निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती आणि उभी पिके करपल्याने बळीराजावर ओढवलेले आर्थिक संकट हे राज्यभरात काळजीची लाट पसरवणारे आहे. अशा अत्यंत संवेदनशील काळात, नाशिकच्या हरसूल भागातील कार्यक्रमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बँका, पतसंस्था, विमा कंपन्या आणि खासगी सावकारांना दिलेल्या गर्भीत इशारा हा अत्यंत आवश्यक आणि बळीराजाला मोठा दिलासा देणारा ठरला आहे. दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करून त्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, हा स्पष्ट संदेश प्रशासकीय व वित्तीय संस्थांची दडपशाही रोखण्यासाठी महत्त्वाचा आहे. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त असताना, शासनाकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची तातडीची मदत, 'नमो शेतकरी महासन्मान निधी'च्या माध्यमातून मदतीचा आकडा वर्षाला १२ हजार रुपयांपर्यंत नेणे, तसेच नुकसानभरपाईची मर्यादा तीन हेक्टरपर्यंत वाढवणे हे निर्णय बळीराजाला सावरण्यासाठी पूरक ठरतील. मात्र, केवळ आर्थिक घोषणा करून चालणार नाही, तर प्रशासकीय पातळीवर पीक नुकसानीचे अचूक पंचनामे वेळेत होणे, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि चाऱ्याचे सुयोग्य नियोजन होणे तितकेच गरजेचे आहे. 'जिथे संकट, तिथे शिवसेना' या भूमिकेतून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी थेट बांधावर जाऊन शासकीय योजनांचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे केलेले आवाहन हे समाजकारणाची उत्तम दिशा दर्शवते. दुष्काळ हा केवळ शेतीपुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला खिळ घालतो. आर्थिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील लग्नकार्ये रखडणे असो वा दैनंदिन शिधा मिळणे कठीण होणे असो, यावर सामुदायिक विवाह सोहळे आणि अन्नधान्य वाटपासारख्या उपक्रमांतून मात करण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. परंतु, कायमस्वरूपी उपायांसाठी छोटे-मोठे जलप्रकल्प वेळेत पूर्ण करणे आणि जलसंधारणाची कामे गतीने राबवणे अपरिहार्य आहे. संकटाच्या या काळात वित्तीय संस्थांनी वसुलीचा तगादा थांबवून सहानुभूतीची भूमिका घ्यावी आणि शासनाने जाहीर केलेल्या सवलती तळागाळातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत विनासायास पोहोचवाव्यात, हीच खरी बळीराजाला आज मिळावयाची सर्वात मोठी साथ ठरेल.

संगमनेरमध्ये 15 लाखांचा संशयास्पद धने व बडीशेपचा साठा जप्त

अहिल्यानगर : सण-उत्सवांच्या (फेस्टिव्हल ड्राईव्ह २०२६) पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना शुद्ध आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत याकरिता अन्न व औषध प्रशासन विभाग (FDA) पूर्णपणे ॲक्टिव्ह मोडवर आला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त श्री. माने आणि अन्न विभागाचे सहायक आयुक्त एस. एच. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा पथकाने २४ ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर येथील एका अन्न प्रक्रिया उद्योगावर धडक कारवाई केली. या छाप्यात सुमारे १५,००,५६६/- (पंधरा लाख पाचशे सहासष्ट) रुपये किमतीचा संशयास्पद आणि मिसब्रँडेड अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे

• **प्रतिष्ठानचे नाव व पत्ता:** मेसर्स जगदंबा फूड प्रॉडक्ट्स, तालुका- संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर.

• **जप्त केलेला मुद्देमाल व किंमत:**

१) धने डाळ (Split Dhana Seeds): एकूण ५,९९८ किलोग्रॅम साठा (किंमत रु. ८,९९,७००/-). सदर साठा 'डी. ए. पटेल, उंझा, गुजरात' या पुरवठादाराकडून मागवण्यात आला होता.

२) बडीशेप (Fennel Seeds/Saunf): एकूण ३,५९८ किलोग्रॅम साठा (किंमत रु. ६,००,८६६/-). हा साठा देखील 'डी. ए. पटेल, उंझा, गुजरात' यांच्याकडून आलेला होता.

• **एकूण जप्त साठा व किंमत:** एकूण ९,५९६ किलो ग्रॅम, एकूण किंमत रु. १५,००,५६६/-

कारवाईचे कारण:

सदर अन्नपदार्थांचा साठा हा 'मिसब्रँडेड' (चुकीची लेबलिंग असलेला) आणि कमी दर्जाचा (Substandard) किंवा आरोग्याला अपायकारक (Unsafe) असल्याच्या संशयावरून जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी या साठ्याचे नमुने (Samples) विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायद्यानुसार पुढील कडक कारवाई केली जाईल.

कारवाई करणारे पथक:

अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी (FSO) यु. आर. सूर्यवंशी आणि सहायक आयुक्त (अन्न) परिमंडळ-२ अहिल्यानगर, श्री. एस. एच. इंगळे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ आणि नियमबाह्य विक्री रोखण्यासाठी प्रशासनाची ही मोहीम अशीच तीव्र गतीने सुरू राहणार असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

प्रेम, नाती आणि भन्नाट गोंधळाची गोष्ट 'सासरे बापरे'!


5 फेब्रुवारीला रंगणार नात्यांची भन्नाट गोष्ट

छत्रपती संभाजीनगर - प्रेमकथा म्हटलं की, सगळं काही सुरळीत आणि परफेक्ट असावं, असं नाही. प्रेमासोबत येणारा गोंधळ, नात्यांमधले मतभेद, एकमेकांना समजून घेण्याची धडपड आणि या सगळ्यात कुटुंबाची होणारी मजेशीर घुसमट... अशाच काहीशा भन्नाट आणि हळुवार नात्यांची गोष्ट घेऊन 'सासरे बापरे' हा आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा झाली असून 'सासरे बापरे' हा चित्रपट येत्या ५ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. 'एक बाप... आणि एक बाप लव्हस्टोरी!' अशी कॅची ओळ घेऊन येणाऱ्या या चित्रपटाचं शीर्षकच उत्सुकता वाढवणारं आहे. नावातला मिश्कीलपणा आणि त्यामागची कौटुंबिक गोष्ट यामुळे 'सासरे बापरे'मध्ये नेमकं काय पाहायला मिळणार, याची उत्सुकता पहिल्याच घोषणेत निर्माण झाली आहे. प्रेम आणि नात्यांच्या या गोष्टीत विनोदाची रंगत असली, तरी माणसांच्या भावविश्वाकडे आणि मानसिक आरोग्यासारख्या महत्त्वाच्या विषयाकडेही संवेदनशील नजरेने पाहाण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे.

भरत जाधव म्हणजे विनोदाचा अचूक टायमिंग.. आणि या सिनेमात विनोदा सोबत आतापर्यंत त्यांच्या न पाहिलेल्या छटा अनुभवायला मिळणार आहेत..

महात्मा फुले द्विजन्मशताब्दी वर्ष : समतेच्या विचारांतून प्रगत महाराष्ट्राचा नवा अध्याय

शिक्षण, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि लोककल्याणाच्या माध्यमातून महात्मा फुले यांचे विचार जनमानसात रुजविण्याचा राज्य शासनाचा संकल्प



समाजाच्या परिवर्तनाची खरी सुरुवात विचारांच्या परिवर्तनातून होते. अज्ञानाच्या अंधःकारात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करून, विषमतेच्या भिंती भेदून आणि शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांना प्रगतीची वाट दाखविणारे महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाचे अध्वर्यू होत. त्यांच्या विचारांना कृतीची जोड देत स्त्रीशिक्षणाचा पाया भक्कम करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनीही सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अजरामर स्थान मिळविले. अशा या महान समाजसुधारकांच्या विचारांचा जागर करण्यासाठी महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हे वर्ष म्हणजे केवळ एका महापुरुषाच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सोहळा नसून, समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांचा वर्तमानाशी संवाद घडविण्याची एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

विचारांचा वारसा, कृतीतून परिवर्तन

महात्मा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून आत्मभान दिले. स्त्री-पुरुष समानता, जातिभेदाचे निर्मूलन, सामाजिक न्याय आणि विवेकनिष्ठ विचारांची पेरणी करत त्यांनी परिवर्तनाची नवी दिशा दाखविली. त्यांच्या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याबरोबरच त्यावर विधायक उपाय सुचविण्याची त्यांची भूमिका. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या विविध विभागांमार्फत समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत विकासाच्या संधी पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पोहोचावा, नागरिकांना योजनांची माहिती सहज समजावी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होता यावे, यासाठी विविध जनजागृतीपर आणि लोकाभिमुख उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. योजनांची माहिती केवळ कार्यालयीन कागदपत्रांपुरती मर्यादित न राहता ती सर्वसामान्यांच्या जीवनाचा भाग व्हावी, हा या उपक्रमांचा मूलभूत हेतू आहे.

शिक्षणातून समतेची पायाभरणी

महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा केंद्रबिंदू शिक्षण हा होता. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून, माणसाला स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणारे आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ देणारे प्रभावी माध्यम आहे, ही त्यांची धारणा आजही तितकीच महत्त्वाची आहे.

याच जाणिवेतून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह' यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समता, बंधुता, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रप्रेमाची मूल्ये रुजविण्यावर भर दिला जात आहे. व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर उपक्रम आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून नव्या पिढीला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली जात आहे.

महापुरुषांच्या जन्मभूमी आणि कर्मभूमींशी संबंधित ऐतिहासिक स्थळांचा विकास करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी अनुभव देण्याचे प्रयत्नही महत्त्वाचे ठरत आहेत. इतिहासाची पाने वाचण्याबरोबरच त्या इतिहासामागील संघर्ष, विचार आणि सामाजिक बांधिलकी अनुभवण्याची संधी नव्या पिढीला मिळणे, हीच अशा उपक्रमांची खरी फलश्रुती आहे.

सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकास

समाजाची प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा विकासाचा प्रकाश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचतो. महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, अल्पसंख्याक कल्याण, बहुजन समाजाचा विकास आणि महिला व बालकल्याण या क्षेत्रांत विविध योजनांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मदत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विशेष अनुदान योजना, चरित्रग्रंथांचे प्रकाशन, लघुकथा लेखन आणि विविध स्पर्धांच्या आयोजनातून सामाजिक प्रबोधनाला चालना दिली जात आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबांना दिलासा मिळावा, त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी आणि त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या उद्देशाने विविध कल्याणकारी उपक्रम राबविले जात आहेत. सवलतीच्या दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यासारख्या योजनांमधून सामान्य कुटुंबांच्या दैनंदिन जीवनातील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या सर्व प्रयत्नांमागे केवळ आर्थिक मदतीची संकल्पना नसून, समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि सन्मान मिळावा, ही व्यापक भूमिका आहे. महात्मा फुले यांच्या समताधिष्ठित समाजरचनेच्या स्वप्नाशी या प्रयत्नांचे नाते जोडलेले आहे.

युवकांसाठी कौशल्य आणि रोजगाराच्या नव्या वाटा

आजच्या बदलत्या काळात शिक्षणासोबत कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. युवकांच्या हातांना काम, कौशल्यांना संधी आणि स्वप्नांना दिशा मिळावी, यासाठी रोजगार मेळावे, कौशल्यविकास कार्यक्रम आणि तंत्रशिक्षणाशी संबंधित विविध उपक्रम राबविले जात आहेत.

रोजगाराच्या संधी आणि युवक यांच्यातील दरी कमी करणे, युवकांना त्यांच्या कौशल्यांनुसार रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश आहे. कौशल्याधारित प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख शिक्षणामुळे युवकांना बदलत्या औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातील संधींचा लाभ घेता येतो. महात्मा फुले यांच्या विचारांतील श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन आणि सामाजिक उन्नतीची मूल्ये आजच्या कौशल्याधिष्ठित विकासाच्या संकल्पनेशी सुसंगत आहेत. युवकांना सक्षम करणे म्हणजे कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देणे आणि पर्यायाने समाजाच्या प्रगतीला गती देणे होय.

ग्रामीण विकास, शाश्वत शेती आणि लोककल्याण

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा समताधिष्ठित समाजनिर्मितीचा महत्त्वाचा आधार आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, जलसंवर्धन, शाश्वत शेती आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा विस्तार यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शेती आणि पाणी यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन जलसंधारणाबाबत जनजागृती करणे, नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे आवश्यक आहे.

लोककल्याणकारी योजनांचा लाभ गावागावांतील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, स्थानिक संस्था आणि विविध सामाजिक घटक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरतो. शासनाच्या योजना आणि जनतेच्या गरजा यांच्यातील दुवा अधिक सक्षम झाल्यास विकासाची प्रक्रिया अधिक परिणामकारक बनते.

संस्कृतीचे जतन, लोकसहभागाचे बळ

समाजाचा सांस्कृतिक वारसा हा त्याच्या सामूहिक स्मृतींचा अमूल्य ठेवा असतो. पारंपरिक प्रथा, लोकपरंपरा, उत्सव आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे डिजिटल माध्यमातून जतन करण्याचे प्रयत्नही महत्त्वाचे ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे म्हणजे परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधणे होय.

शासनाच्या उपक्रमांना नागरिकांचा सक्रिय सहभाग महात्मा फुले यांच्या लाभल्यास त्यांचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक होते. प्रशासनाची तत्परता, विविध विभागांतील समन्वय, प्रसारमाध्यमांची साथ आणि नागरिकांची उत्स्फूर्त भागीदारी यांतून लोककल्याणाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीचे स्वरूप प्राप्त होते.

समतेचा विचार, भविष्याची दिशा

महात्मा जोतीराव फुले यांचे द्विजन्मशताब्दी वर्ष हे इतिहासाचे स्मरण करण्याबरोबरच वर्तमानाचे आत्मपरीक्षण करण्याचे आणि भविष्याची दिशा निश्चित करण्याचे वर्ष आहे. समाजात शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे, स्त्रियांना सन्मान आणि स्वातंत्र्य मिळवून देणे, वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहात आणणे आणि प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेने जगता येईल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे, हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पेरलेल्या परिवर्तनाच्या बीजांचा आज वटवृक्ष झाला आहे. मात्र, त्या वटवृक्षाची सावली समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आजही आपलीच आहे. शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक उपक्रम, सामाजिक प्रबोधन, कौशल्य विकास आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून समतेच्या मूल्यांना कृतीची जोड देणे आवश्यक आहे.

महापुरुषांचे विचार केवळ जयंती-पुण्यतिथीपुरते मर्यादित न राहता ते आपल्या दैनंदिन आचरणात उतरले, तरच परिवर्तनाचा प्रवास खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षाचा हाच संदेश आहे—ज्ञानातून जागृती, समतेतून एकता आणि लोककल्याणातून समृद्ध महाराष्ट्राची निर्मिती.

संजीवनी जाधव
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

दुष्काळ निवारण्यासाठी खारीचा वाटा उचलूया



दुष्काळ म्हणजे केवळ पाऊस कमी पडणे नव्हे. पाण्याची टंचाई, शेतीच्या उत्पन्नात घट, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पशु पक्षांचा जगण्याचा प्रश्न, वाढता घरखर्च आणि रोजगाराच्या संधींवर होणारा परिणाम,असे त्याचे अनेक पैलू आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि लगतच्या काही भागातील जनतेला दुष्काळाचे चटके वारंवार सहन करावे लागतात. अशा वेळी शासनाच्या मदतकार्याबरोबरच नागरिकांनीही उपलब्ध साधनसंपत्तीचा जपून वापर करणे आवश्यक आहे. जुन्या पिढीने अनुभवातून सांगितलेले एक वाक्य आजही महत्त्वाचे आहे, 'दुष्काळ सगळ्यांना काटकसर शिकवतो!' मात्र, ही काटकसर नेमकी कशी करावी, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

पाण्याचा अपव्यय टाळा, काटेकोर नियोजन करा.

दुष्काळात प्रत्येक थेंब महत्त्वाचा असतो. पाण्याचे दुर्भिक्ष होऊ शकते हे आपल्या प्रत्येकाच्या लक्षात असले पाहिजे. आपण पाणी कमी वापरल्याने काय फरक पडणार हा प्रश्न पहिले मनातून काढून टाकणे आवश्यक आहे. घरातील गळणारे नळ त्वरित दुरुस्त करावेत. दात घासताना, दाढी करताना किंवा भांडी घासताना नळ सतत सुरू ठेवू नये. आंघोळीसाठी शॉवरऐवजी बादलीचा वापर करावा. वाहन धुण्यासाठी पाइपऐवजी बादली वापरावी. भाजी धुण्यासाठी वापरलेले पाणी झाडांना वापरता येईल. घरातील पाण्याच्या टाकीला स्वयंचलित नियंत्रण किंवा ओव्हरफ्लो रोखण्याची व्यवस्था करावी.

पिण्यासाठी पाण्याला प्राधान्य

पिण्याचे व स्वयंपाकाचे पाणी प्राधान्याने राखून ठेवावे. उपलब्ध पाण्याचा वापर पिणे, स्वयंपाक, स्वच्छता आणि इतर कामांसाठी आवश्यकतेनुसार विभागून करावा. पिण्याचे पाणी स्वच्छ, झाकलेल्या भांड्यात साठवावे. पाणीटंचाई असताना पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेशी तडजोड करू नये.

सार्वजनिक पुरवठ्यांवर नजर ठेवणे

गावांमध्ये सार्वजनिक नळांवरील गळती थांबवणे, पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकाचे पालन करणे आणि पाण्याचे समान वाटप सुनिश्चित करणे, ओलीतासाठी ठिबक सिंचनाचा वापर करणे, शेततळी, नालाबांध, बंधारे आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजना स्थानिक परिस्थितीनुसार राबवाव्यात. रोजगार हमीच्या कामांतून जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यासाठी ग्रामपंचायत आणि प्रशासनाशी समन्वय साधावा. पुढील पावसाळ्यात भूजल पुनर्भरण करता यावे, यासाठी आवश्यक कामांचे नियोज आजपासून करावे. त्यासाठी बंधारे, छोटे बांध,नाला खोलीकरण रुंदीकरण असे उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील प्रत्येक घरावर टीन असो वा कवेलू त्यावरील पाणी जमिनीत मुरेल याचे नियोजन करण्याची सूचना देखील हा दुष्काळ करतो आहे हे प्रत्येकाने लक्षात घेणे आवश्यक आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग आता प्रत्येक घरासाठी अनिवार्य स्वतः करणे महत्त्वाचे ठरते. भूजल पुनर्भरणासाठी या छोट्या उपाययोजना अधिक आवश्यक ठरतात.

दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होतो.

आपली सर्व अर्थव्यवस्था ही शेतीवर आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था उत्पादनावरून अवलंबून असते. त्यामुळे दुष्काळ पडू शकतो हे गृहीत धरून उपलब्ध पाणी, जमिनीतील ओलावा, पीकस्थिती आणि संभाव्य उत्पन्न यांचा हिशेब करणे गरजेचे आहे. पुढील पेरणीपूर्वी कृषी विभागाच्या सल्ल्याने कमी पाण्यात येणारी, स्थानिक हवामानाला अनुरूप पिके निवडावीत. पाणी उपलब्ध नसताना जास्त पाणी लागणाऱ्या पिकांसाठी मोठी गुंतवणूक करण्यापूर्वी संभाव्य नुकसानाचा विचार करावा. शक्य असेल तेथे ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनातून पाणी थेट पिकांच्या मुळांजवळ पोहोचते. सिंचनासाठी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी योग्य वेळ निवडावी आणि शेतातील पाइप, व्हॉल्व्ह व जोडण्यांमधील गळती थांबवावी. जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी पिकांचे अवशेष किंवा योग्य आच्छादन वापरावे. गरजेपेक्षा जास्त पाणी देणे टाळावे.

माती परीक्षण ; चाऱ्याची उपलब्धता

खते आणि कीटकनाशके अंदाजाने वापरण्याऐवजी माती परीक्षण, पीकस्थिती आणि कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार वापरावीत. बियाणे, खते आणि औषधे एकत्रित खरेदी करणे, यंत्रसामग्री सामायिक वापरणे आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून खर्च विभागून घेणे शक्य आहे. पीकविमा, शासकीय मदत आणि रोजगार योजनांची माहिती अधिकृत यंत्रणांकडून घ्यावी.

पशुधन आणि चाऱ्याची बचत करावी, जनावरे ही ग्रामीण कुटुंबांची महत्त्वाची संपत्ती आहे. उपलब्ध चारा मोजून वापरावा आणि चाऱ्याची नासाडी होणार नाही, अशी व्यवस्था करावी. पिकांचे सुरक्षित अवशेष योग्य पद्धतीने साठवावेत. शक्य असल्यास चारा उत्पादनासाठी नियोजन करावे. जनावरांना स्वच्छ पाणी नियमित उपलब्ध करून द्यावे. त्यांच्या आहारात अचानक बदल करू नये आणि पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार काळजी घ्यावी. चाऱ्याची टंचाई गंभीर झाल्यास चारा छावण्या किंवा अन्य शासकीय सुविधांसाठी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा.

रोजगार, बचत आणि सामूहिक मदत

शेतीतून उत्पन्न कमी झाल्यास ग्रामपंचायत आणि रोजगार हमी यंत्रणेकडे उपलब्ध कामांची माहिती घ्यावी. पात्रतेनुसार रोजगार व मदत योजनांसाठी अर्ज करावा. घरातील उपलब्ध धान्याचे नियोजन करावे. आर्थिक अडचणीच्या काळात जास्त व्याजाचे कर्ज घेण्याऐवजी अधिकृत मदत आणि उपलब्ध पर्याय तपासावेत.

दुष्काळ हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक, सामाजिक संस्था, व्यापारी आणि सेवाभावी संघटनांनी गरजू कुटुंबांना अन्नधान्य, शैक्षणिक साहित्य किंवा आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदत करावी. ही मदत स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून आणि लाभार्थ्यांची प्रतिष्ठा जपत करावी.

घरखर्चाचे नियोजन करा; अनावश्यक खर्च टाळा

दुष्काळात उत्पन्न कमी होण्याची शक्यता असताना कुटुंबाने मासिक खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवावा. अन्नधान्य, औषधे, शिक्षण, वीज आणि आवश्यक प्रवास यांसाठीचा खर्च प्रथम बाजूला ठेवावा. अनावश्यक खरेदी, महागड्या वस्तू, दिखाऊपणा आणि परवडत नसताना घेतलेले कर्ज टाळावे. बाजारात जाण्यापूर्वी आवश्यक वस्तूंची यादी करावी. काटकसरीने खरेदी करायचे आहे आवश्यक तीच खरेदी करायची आहे हे लक्षात घेऊनच बाजारात पाऊल ठेवणे उपयुक्त ठरेल. आठवड्याचा भाजीपाला आणि महिन्याचा किराणा नियोजन केल्यास अनावश्यक खरेदी कमी होते. यंदाच्या दिवाळीत फटाके, महागडे कपडे, सजावटीच्या वस्तू आणि अनावश्यक भेटवस्तूंवरील खर्च कमी करता येईल. सणाचा आनंद साधेपणानेही घेता येतो. आज वाचवलेली रक्कम पुढील काही महिन्यांतील अडचणींसाठी उपयोगी पडू शकते. मात्र, काटकसर करताना पोषण, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नये.

काटकसर हीच सामूहिक ताकद

दुष्काळ पूर्णपणे टाळणे प्रत्येकाच्या हातात नसले, तरी त्याचे परिणाम कमी करण्यासाठी प्रत्येक जण काही ना काही करू शकतो.अगदी समूह शेती सारख्या सहकार तत्वाचा स्वीकार करणे. सार्वजनिक पानवठ्यांचा योग्य वापर करणे, घरात पाण्याची बचत, शेतीत खर्चाचे नियोजन, पशुधनाची काळजी, अनावश्यक खरेदीला आळा आणि गरजूंच्या मदतीला धावून जाणे, या कृती संकटाची तीव्रता कमी करू शकतात.

सण-उत्सवात आपल्या शेजाऱ्याची परिस्थिती समजून घेणे आणि शक्य ती मदत करणे हेही सामाजिक दायित्व आहे. अशावेळी सण देखील सामूहिकरित्या साजरे केले जाऊ शकतात. एकत्रित येऊन साधेपणाने उत्सव साजरा केला जाऊ शकतो. त्यासाठी पुढाकार कोण घेईल याची वाट पाहता एक पाऊल पुढे टाकून गावागावात वेगवेगळे उपक्रम राबविणे गरजेचे ठरते.

दुष्काळ भविष्याची बांधणी करतो

यापूर्वीही अनेकदा दुष्काळाचा सामना दुष्काळी प्रदेशाने केला आहे.मात्र,ज्याच्याकडे मदतीची दानत आहे त्यांनी इतरांना मदतीसाठी हात पुढे केला आहे. सामान्यातला सामान्यमाणूस एकत्रित येऊन अशा वेळी असामान्य कामे करू शकतात. त्यामुळे विवाहसोहळ्यांना सामूहिक स्वरूप देण्यापासून तर सण उत्सवही एकत्रित करण्यापर्यंत अनेक उपाययोजना गावागावात होऊ शकतात. खरे तर अशी परिस्थिती भविष्यात उद्भवू नये यासाठी निसर्ग दुष्काळाच्या नावाने एक संधीही निर्माण करत असते. मराठवाड्यातील प्रत्येक गाव पाणीदार व्हावे, प्रत्येक गावाचे पाण्याचे ऑडिट व्हावे,त्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना करण्यासाठी या दुष्काळात चिंतन होणे गरजेचे आहे.शासनस्तरावरून सर्वांची काळजी घेतली जाते मात्र गावे जर स्वावलंबी बनली तर अशावेळी प्रशासनालाआणखी मदत होते. त्यामुळे या दुष्काळात खर्चापासून पाण्याच्या बचतीपर्यंत थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे दुष्काळावर मात करणाऱ्या घटकांसाठी प्रयत्न करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर
मोबाईल
न.9702858777

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

शिवछत्रपती महाविद्यालयात जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

भारतीय साहित्य आणि संस्कृतीला अमूल्य योगदान देणारे आद्यकवी महर्षी वाल्मीकी यांच्या जयंतीनिमित्त शिवछत्रपती महाविद्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सत्य, कर्तव्य, नैतिक मूल्ये आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या महर्षी वाल्मीकी यांच्या विचारांचे स्मरण यावेळी करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला उपप्राचार्या डॉ. एस. डी. राजमाने यांची उपस्थिती होती.

महर्षी वाल्मीकी यांनी रचलेल्या रामायण या महाकाव्याने भारतीय साहित्य, संस्कृती आणि जीवनमूल्यांना समृद्ध केले आहे. त्यांच्या साहित्यकृतीतून आदर्श जीवनाची शिकवण मिळते. सत्याची कास धरणे, कर्तव्याचे पालन करणे आणि मानवी मूल्यांची जपणूक करणे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण संदेश आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. सी. एस. पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. योगेश धाटे यांनी केले. महर्षी वाल्मीकी यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिवना येथील शिवसेना कार्यालयात महर्षी वाल्मीक ऋषी जयंती साजरी



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील शिवसेना कार्यालयात आद्यकवी महर्षी वाल्मीक ऋषी यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मीक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य राजुबाबा काळे, रावकाका, माजी सरपंच रघुनाथ वाघ, विठ्ठल पाटील राऊत, माजी उपसरपंच गणेश सपकाळ, सिल्लोड काँग्रेस तालुका अध्यक्ष नेते ॲड. निलेश काळे, संभाजी ब्रिगेडचे माजी ग्रामपंचायत सदस्य सचिन राऊत तसेच जगन्नाथ वाघ यांच्यासह इतर पदाधिकारी, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बेरोजगारांसाठी उद्योग उभारणीची संधी; कर्ज योजनेसाठी 30 नोव्हेंबरपर्यंत अर्ज करा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, इच्छुक व पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या उपआयुक्तांनी केले आहे. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंतर्गत ११ मे २०२६ पासून अर्जांचे वाटप व स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र कर्ज प्रकरणे बँकांकडे शिफारशीसाठी पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे स्वतःचा उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या बेरोजगारांना या योजनेच्या माध्यमातून पुढाकार घेता येणार आहे. या योजनेसाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांना सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अर्ज सादर करता येतील. मुदतीनंतर अर्ज करण्याची संधी मिळेलच, असे नाही. त्यामुळे पात्र सुशिक्षित बेरोजगारांनी अंतिम तारखेची वाट न पाहता विहित मुदतीत अर्ज सादर करावेत आणि उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, : जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या महान कार्याचे, साहित्यिक योगदानाचे तसेच भारतीय संस्कृती आणि साहित्यविश्वातील त्यांच्या महत्त्वपूर्ण स्थानाचे स्मरण करण्यात आले.

जिल्हा बँकेचे 700 कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट

रब्बीसाठी 210 कोटी, तर खरीपसाठी 490 कोटींचे नियोजन; वैयक्तिक, गृह, वाहन व सोनेतारण कर्जाचे व्याजदरही कमी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी खरीप आणि रब्बी हंगामात एकूण ७०० कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. रब्बी हंगामासाठी २१० कोटी, तर खरीप हंगामासाठी ४९० कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना पेरणीच्या सुरुवातीलाच पीककर्ज उपलब्ध करून देण्यावर बँकेचा भर राहणार आहे. बँकेचे चेअरमन विलास संदिपान पा. भुमरे आणि व्हाईस चेअरमन रामराव शेळके यांनी ही माहिती दिली.

रब्बी हंगामातील पीककर्ज वाटपाला १ नोव्हेंबर २०२६ पासून सुरुवात करण्याचे नियोजन आहे. या हंगामात २१० कोटी रुपयांचे उद्दिष्ट असून, ते १०० टक्के पूर्ण करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. खरीप हंगाम २०२७ साठी १ एप्रिल २०२७ पासून पीककर्ज वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. या हंगामासाठी ४९० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पात्र कर्जदार सभासद शेतकऱ्यांना नियमानुसार वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे. बियाणे, खते, औषधे आणि अन्य कृषी निविष्ठांच्या खरेदीसाठी हंगामाच्या सुरुवातीलाच आर्थिक मदत मिळाल्यास शेतकऱ्यांना शेतीचे नियोजन करणे सुलभ होणार आहे.

बँकेच्या संचालक मंडळाने विविध कर्ज योजनांमध्येही बदल केले आहेत. वैयक्तिक कर्जाची कमाल मर्यादा २५ लाख रुपयांपर्यंत वाढवून व्याजदर १२ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. नवीन चारचाकी वाहन कर्जाची कमाल मर्यादाही २५ लाख रुपये करण्यात आली असून, त्याचा व्याजदर ११ टक्के निश्चित केला आहे. गृहकर्जाचा व्याजदर ११ टक्के करण्यात आला असून, सोनेतारण कर्जाचे वाटपही ११ टक्के व्याजदराने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शेतकरी सभासदांना वेळेत पीककर्ज मिळावे, कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण व्हावे आणि ग्राहकांना आवश्यक आर्थिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी प्रयत्नशील असल्याचे बँकेच्या वतीने सांगण्यात आले. सुधारित कर्ज योजनांचा लाभ पात्र ग्राहकांना संबंधित अटी व नियमांनुसार मिळणार आहे. पीककर्ज वाटपाबरोबरच विविध कर्ज योजनांतील बदलांतून शेती क्षेत्राला आर्थिक बळ देणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा बँकेचा प्रयत्न आहे.

परभणी जिल्ह्यात 27 ऑक्टोबर 2026 रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

408691 जंतनाशक गोळी देण्यात येणार

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी** जिल्ह्यातील बालकांचे व किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यातील रक्तक्षयाचे प्रमाण कमी व्हावे तसेच त्यांची शारीरिक वाढ व बौद्धिक विकास चांगल्या प्रकारे व्हावा, या उद्देशाने माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील १ ते १९ वयोगटातील बालकांना व मुला-मुलींना एकाच दिवशी जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळा, अंगणवाड्या आणि आरोग्य संस्थांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. लहान मुलांमध्ये व किशोरवयीन मुला-मुलींमध्ये आतड्यांतील जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. जंतांच्या संसर्गामुळे शरीरातील पोषक घटकांचे शोषण कमी होणे, रक्तक्षय, अशक्तपणा, भूक मंदावणे तसेच शारीरिक व बौद्धिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे बालकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नियमित जंतनाशक औषधोपचार महत्त्वाचे आहेत. राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेच्या दिवशी जिल्ह्यातील पात्र बालकांना व मुला-मुलींना शाळा, अंगणवाडी केंद्रे आणि सर्व आरोग्य संस्थांच्या माध्यमातून जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना२११९ शाळेच्या माध्यमातून, १९२४ अंगणवाडीत नोंदणीकृत बालकांना अंगणवाडी केंद्रांमध्ये औषध देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. शाळेत किंवा अंगणवाडीत न जाणाऱ्या पात्र बालकांना मोहिमेचा लाभ मिळावा, यासाठी आरोग्य संस्थांच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

ग्राम जागर साहित्य संमेलन 28 व 29 नोव्हेंबरला चाटोरी येथे होणार

संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. इंद्रजीत भालेराव, स्वागत अध्यक्ष पदी कृषिभूषण कांतराव देशमुख

हिंदु प्रकाश वार्ता

परभणी**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई यांच्या अनुदानातून तसेच पालम तालुक्यातील चाटोरी येथील अरुण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने चाटोरी येथे 28 व 29 नोव्हेंबरला जिल्हास्तरीय ग्राम जागर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे या संमेलनाच्या अध्यक्ष पदी सुप्रसिद्ध साहित्यिक व प्राध्यापक इंद्रजीत भालेराव सर यांचे तर स्वागत अध्यक्ष पदी सर्वांचे परिचित कृषी भूषण कांतराव देशमुख झरीकर यांची निवड करण्यात आली आहे.

हे संमेलन 28 व 29 नोव्हेंबर रोजी पालम तालुक्यातील चाटूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहेत दोन दिवशी संमेलनात ग्रंथ दिंडी उद्घाटन सोहळा कवी संमेलन कथाकथन मराठी गझल मुलाखत तसेच विविध विषयावरील परिसंवाद आणि समारोपाचे आयोजन करण्यात येणार आहे याच सोबत चित्र प्रदर्शन स्मरणिका प्रकाशन आणि ग्रंथ प्रदर्शनाही भरण्यात येणार आहे ग्रामीण जीवन आणि ग्रामीण भागातील प्रश्न



आणि सामान्य माणसाच्या व्यथा आपल्या कवितेतून प्रभावीपणे मांडणारे कवी प्राध्यापक इंद्रजीत भालेराव यांच्या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे तर शेतीमाती आणि पाणी आणि समशानभूमी या विषयावर जनजागृती करणारे कृषिभूषण कांतराव देशमुख यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांचे स्वागत अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे असे संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. या संमेलनाचे सविस्तर अशी माहिती कार्यक्रम पत्रिका द्वारे लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती या कार्यक्रमाचे संविधान समितीच्या वतीने देण्यात आली आहे यामध्ये मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर दीनानाथ फुलवाडकर संयोजक प्रा.संदीप किरडे ,सचिन जोशी, सुभाष ढगे ,प्राचार्य डी बी पवार ,डॉ.जयंत बोबडे ,माधव गव्हाणे आणि आत्माराम जाधव यांचा समावेश आहे

श्री महर्षी वाल्मिकी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: श्री महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार प्रमोद वाकोडकर, महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष नानासाहेब भेंडेकर , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके, प्रवीण कोकांडे , विश्वनाथ कणके , उमेश फुलपगार , पंचशीलकरूणा बगाटे , श्री. कांदे , श्री. काळे, दत्ता शहाणे , यांच्यासह अधिकारी-कर्मचारी, उपस्थित होते.

मेरा युवा भारत'तर्फे 'नशामुक्त युवा' संकल्पनेवर ब्लॉक नेबरहूड युथ पार्लमेंटचे यशस्वी आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी-**-भारत सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या 'मेरा युवा भारत', परभणीच्या वतीने दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी 'नशामुक्त युवा' या संकल्पनेवर आधारित ब्लॉक नेबरहूड युथ पार्लमेंट २०२६-२७ चे यशस्वी आयोजन करण्यात आले. पूर्णा तालुक्यातील लिमला येथील जय किसान विद्यालयात आयोजित या कार्यक्रमात परिसरातील सुमारे १५० युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये अमली पदार्थांचे सेवन, तंबाखू व इतर व्यसनांचे दुष्परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा होता. युवकांना सामाजिक प्रश्नांवर आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्माणाची भावना विकसित करणे, यावरही या उपक्रमातून भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे संचालक व्ही. बी. जोगदंड, विद्यालयाचे प्राचार्य अनंत काळे, प्राध्यापिका मीरा जाधव आणि सोनावळे उपस्थित होते. मान्यवरांनी मार्गदर्शन करताना व्यसनाधीनतेमुळे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर, कुटुंबावर आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या विपरीत परिणामांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले.

संस्थेचे संचालक श्री. व्ही. बी. जोगदंड यांनी युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, कौशल्यविकास आणि उज्ज्वल भवितव्यावर लक्ष केंद्रित करावे, असे प्रतिपादन केले. स्वतः व्यसनमुक्त राहण्यासोबतच मित्रपरिवारात आणि समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे त्यांनी आवाहन केले.

विद्यालयाचे प्राचार्य अनंत काळे यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात शिस्त, योग्य संगत आणि सकारात्मक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. व्यसनांपासून दूर राहण्यासाठी युवकांनी आरोग्याची काळजी घेणे, खेळ, वाचन आणि विविध विधायक उपक्रमांमध्ये सहभागी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. निरोगी आणि शिस्तबद्ध युवा हेच देशाच्या प्रगतीचे महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्राध्यापिका मीरा जाधव यांनी व्यसनांचे आकर्षण टाळून योग्य निर्णय घेण्याचे आणि मानसिक आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले. कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला बळी न पडता आत्मविश्वासाने जीवनातील आव्हानांना सामोरे जाणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. व्यसनाधीनतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्राध्यापिका सोनावळे यांनी व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक असल्याचे सांगितले. युवकांनी कुटुंबात, शैक्षणिक संस्थांमध्ये आणि परिसरात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान युवकांना व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्यासोबतच इतरांनाही त्यासाठी प्रेरित करण्याचा संदेश देण्यात आला. अशा उपक्रमांमुळे सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता वाढण्यास, विचारांची देवाणघेवाण होण्यास आणि समाजहिताच्या कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळते.

नशामुक्त युवा' ही संकल्पना निरोगी, सक्षम आणि जबाबदार युवा पिढी घडविण्याच्या व्यापक उद्दिष्टाशी संबंधित आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी पुढाकार घेऊन राष्ट्राच्या विकासात सक्रिय योगदान देण्याचा संदेश देण्यात आला. सहभागींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

गावासाठी मैदान हा ग्रामस्थांचा हक्क : महेंद्रशेठ घरत



उरण दि २६()"क्रिकेटचा मी निस्सीम चाहता आहे,पण आज तरुणांना खेळण्यासाठी मैदानेच नाहीत. ही गावोगावची खूप मोठी शोकांतिका आहे. गावासाठी मैदान हा ग्रामस्थांचा मूलभूत हक्क आहे. तो मिळालाच पाहिजे. तो मिळवण्यासाठी एक होणे ही काळाची गरज आहे. गावाच्या भल्यासाठी तरुण पेटून उठले तर काहीही अशक्य नाही. अशा कामात मी सदैव आपल्या पाठीशी आहे. आजही मी फोर्टी प्लसचा कॅप्टन आहे. मी अनेक गावांना मैदाने मिळवून दिली. जमिनी आपल्या आहेत, त्यावर हक्क आपलाच आहे. त्यासाठी तरुणांची एकजूट महत्त्वाची आहे. गावाच्या विकासासाठी राजकीय चपला बाजूला ठेवा, मी बघा शेलघर कसे बनवले आहे. स्वतः रस्त्यावर उतरून गावचा विकास केला. मला तरुणांकडून हेच अपेक्षित आहे." असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत महानगर येथे म्हणाले.

उरण प्रीमियर लीगच्या सहाव्या पर्वाचे सोमवारी (ता. २६) महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते मानघर येथील छाया रिसॉर्ट येथे उद्घाटन झाले. यावेळी महेंद्रशेठ घरत बोलत होते. यावेळी शेकाप नेते दीपक मढवी, विशाल पाटील, मध्य प्रदेशच्या मऊगंज येथील पतुलखी छत्रपाल सिंहच्या

सरपंच अनुराधा साकेत, राजेंद्र भगत, आयोजक अतुल मढवी, कल्पेश पाटील उपस्थित होते. सुप्रसिद्ध सूत्रसंचालक नितेश पंडित यांनी उत्तम असे सूत्रसंचालन केले.

माणगाव बौद्धजन पंचायत समितीच्या वर्षावास धम्म प्रवचन मालिकेच्या तिसऱ्या पर्वाचा भव्य सांगता समारोप मंगलमय वातावरणात संपन्न

प्रवचनकार- अभिज्ञा शिर्के यांचे "बौद्ध धम्मातील स्त्रियांची कालची आणि आजची स्थिती" या विषयावर प्रबोधनात्मक प्रवचन, माणगावकर मंत्रमुग्ध



*माणगाव रायगड - बौद्ध धम्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी अहोरात्र झटणाऱ्या बौद्धजन पंचायत समिती, तालुका शाखा माणगाव या धम्म प्रचार आणि प्रसाराचा आदर्श दीपस्तंभ ठरलेल्या शाखेच्या वतीने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिका 2026 च्या तिसऱ्या पर्वाचा भव्य सांगता समारोप सोहळा आज दिनांक 25 ऑक्टोबर 2026, रविवार रोजी सकाळी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, माणगाव (काळ नदी शेजारी) येथे आश्विन पौर्णिमेच्या मंगल दिनी मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

संस्थापक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि सभापती मा. आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव तालुका शाखेने आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या सलग तीन महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण माणगाव तालुक्यात ही मालिका राबविली. या मालिकेत तालुक्यातील सर्व 11 उपशाखा आणि गावांमध्ये दर रविवारी धम्म प्रबोधन करण्यात आले.

सलग तीन महिने अखंड धम्म प्रबोधन सेवा

या वर्षीची मालिका तृतीय वर्षावास कार्यक्रम म्हणून राबविण्यात आली. यामध्ये आषाढ पौर्णिमा आणि वर्षावासाचे महत्त्व, बौद्ध धम्म - एक विज्ञानवादी मार्ग, कर्म सिद्धांत आणि मानवी जीवन, बौद्ध संस्कृतीची उजाळा, दहा पारमिता, विपश्यना, महामंगल सुत्त आणि मानवी जीवनातील महत्त्व यांसारख्या विषयांवर प्रबोधन करण्यात आले.

या तीन महिन्यांच्या धम्म यज्ञात प्रमुख प्रवचनकार म्हणून *मा. कुंदा राजन खरात (मॅडम), मा. रुपेश गमरे (सर), मा. अरविंद मोरे, मा. सिद्धार्थ संदेश जाधव, मा. सुनिल देवरे, मा. सूर्यकांत कासे, मा. ॲड. मयूर मोरे (हायकोर्ट मुंबई), मा. पराग जाधव* यांच्यासह तालुका शाखा पदाधिकारी व प्रसिद्धी प्रमुखांनी आपले अनमोल योगदान दिले.

आजच्या मुख्य सोहळ्याचे आकर्षण

आजच्या सांगता सोहळ्याचे अध्यक्षस्थान तालुका शाखेचे विद्यमान अध्यक्ष *मा. रवींद्र जी मोरे* यांनी भूषविले. सदर कार्यक्रमाची सुरुवात बौद्धाचार्य दिपक शिर्के आणि विजय पवार यांच्या मंगलमय धम्म वाणीतून त्रिशरण पंचशील ग्रहण करून करण्यात आली. तद्नंतर या सोहळ्यात प्रमुख प्रवचनकार *अभिज्ञा शिर्के* यांनी *"बौद्ध धम्मातील स्त्रियांची कालची आणि आजची स्थिती"* या विषयावर अत्यंत प्रभावी आणि डोळस प्रबोधन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थित धम्म उपासक-उपासिका भारावून गेल्या.

या प्रसंगी वर्षावास धम्म प्रवचन मालिकेतील सर्व प्रवचनकार, समाज सेवक, स्वच्छता दूत, धम्म दान व भोजन दान दाते तसेच तालुका प्रसिद्धी प्रमुखांचा विशेष सत्कार आणि गौरव तालुका शाखेच्या माध्यमातून करण्यात आला.

अनुकरणीय नेतृत्व आणि आयोजन

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका कार्यकारिणीने अनुकरणीय नेतृत्व दाखविले. *अध्यक्ष - मा. रवींद्र मोरे, उपाध्यक्ष - मा. नामदेव राव, सचिव - मा. आर. डी. साळवी (रघुनाथ साळवी), सह सचिव - मा. रणजित मोहिते, कोषाध्यक्ष/खजिनदार - मा. सुरेंद्र जाधव, कायदेशीर सल्लागार - मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नरेश जाधव, संघटक - मा. पराग जाधव आणि तिन्ही तालुका प्रसिद्धी प्रमुख - पत्रकार उत्तम तांबे, पत्रकार गौतम जाधव, पत्रकार विश्वास गायकवाड* तसेच तालुक्यातील सर्व अकरा उपविभागीय शाखांचे आजी-माजी पदाधिकारी, सभासद आणि हितचिंतक धम्म बंधू-भगिनी यांच्या सहकार्याने हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

विशेष म्हणजे या कार्यक्रमात *भोजनदान दाते मा. विनोद मोरे* यांच्या वतीने सर्व उपासकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व उप शाखांचे सन्माननीय आजी माजी पदाधिकारी सभासद, धम्म उपासक ,उपासिका व धम्म बंधू-भगिनींनी शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थिती लावत सोहळ्याची शोभा वाढविली.

केवळ कार्यक्रम घेणे नव्हे, तर गावागावात बुद्ध, धम्म आणि संघाची शिकवण पोहोचवून तरुण पिढीला संस्कारित करण्याचे महान कार्य माणगाव तालुका शाखा करत असून त्यांचे हे योगदान संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आणि अभिनंदनीय असल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

विकासकामांना गती द्या; गुणवत्तेशी तडजोड नको!

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून संभाजीनगरातील विविध प्रकल्पांची पाहणी; डिसेंबरपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासोबतच बांधकामांचा दर्जा आणि गुणवत्ता कायम राखण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. शहरातील विविध महत्त्वपूर्ण विकासप्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. सारथी संकुल, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा दुसरा टप्पा, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठीची निवासी इमारत, नगरनाका ते पडेगाव सहापदरी रस्ता आणि औद्योगिक क्षेत्राला जोडणारा प्रस्तावित उन्नत रस्ता अशा विविध प्रकल्पांचा या पाहणीत समावेश होता.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विकासकामांना गती देण्याच्या अनुषंगाने मंत्री भोसले यांनी हा दौरा केला. विविध ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामांची सद्यःस्थिती, कामांचा वेग, बांधकामाची गुणवत्ता आणि उर्वरित कामांचे नियोजन याबाबत त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांकडून माहिती घेतली. विकासकामे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात दर्जेदार पायाभूत सुविधांच्या स्वरूपात नागरिकांना उपलब्ध व्हावीत, यासाठी निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला.

डॉ. हेडगेवार रुग्णालयाजवळ उभारण्यात येत असलेल्या सारथी संकुलाची पाहणी करून मंत्री भोसले यांनी बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या प्रकल्पांतर्गत प्रशासकीय इमारत, मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह आणि अभ्यासिका अशा चार इमारती उभारण्यात येत आहेत. मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहांमध्ये प्रत्येकी ५२८ विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक आणि निवासाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. बांधकामाचा दर्जा कायम राखून उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या संकुलाचे उर्वरित बांधकाम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

यानंतर कांचनवाडी येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या फेज-२ अंतर्गत सुरू असलेल्या प्रशासकीय इमारत, ग्रंथालय आणि व्याख्यानगृहाच्या बांधकामांची पाहणी करण्यात आली. ग्रंथालयाच्या पूर्ण झालेल्या बांधकामाची पाहणी करतानाच प्रशासकीय इमारत आणि व्याख्यानगृहातील फरशी, फॉल्स सिलिंग, भिंतींचे फिनिशिंग, अंतर्गत विद्युत व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती मंत्री भोसले यांनी घेतली. उर्वरित कामांना गती देऊन ती नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

नेहरूनगर येथे उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठी बांधण्यात येत असलेल्या जी+१० निवासी इमारतीच्या कामांचाही त्यांनी आढावा घेतला. इमारतीतील खोल्या, हॉल, फ्लोरिंग, स्वयंपाकघर, स्वच्छतागृहे, विद्युत व्यवस्था, पाणीपुरवठा, लिफ्ट आणि अग्निशमन यंत्रणा यांची माहिती घेण्यात आली. बांधकामाचा दर्जा आणि अंतर्गत सुविधांची गुणवत्ता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या. या इमारतीचे बांधकाम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करून हस्तांतरित करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, नगरनाका ते पडेगाव या सहापदरी रस्त्याच्या बांधकामाची पाहणी करून मंत्री भोसले यांनी डांबरीकरण, ड्रेनेज व्यवस्था, बांधकामाची गुणवत्ता आणि कामाच्या वेगाचा आढावा घेतला. रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षलागवडही करण्यात आली. तसेच वाळूज-पंढरपूर-कॅम्ब्रिज-शेंद्रा एमआयडीसी या प्रस्तावित उन्नत रस्त्याच्या प्रकल्पाची सद्यःस्थिती जाणून घेण्यात आली. या प्रकल्पामुळे औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास, वाहतूक कोंडी कमी होण्यास आणि दळणवळणाला गती मिळण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर

शहरातील शैक्षणिक, प्रशासकीय, निवासी आणि वाहतूकविषयक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सुरू असलेल्या या प्रकल्पांचा आढावा घेताना मंत्री भोसले यांनी कामांचा दर्जा आणि निर्धारित वेळापत्रकाचे पालन करण्यावर भर दिला. उर्वरित बांधकामे वेगाने पूर्ण करताना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना दिल्या. या दौऱ्याप्रसंगी मंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे, माजी खासदार भागवत कराड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शहरातील महत्त्वाच्या विकासप्रकल्पांना गती देण्याच्या दृष्टीने ही पाहणी महत्त्वाची ठरली. आता संबंधित यंत्रणा कामांचा वेग वाढवून निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण करतात का, याकडे लक्ष लागले आहे.

नादुरुस्त पिकअपला पाठिमागून कार धडकली; तरुण ठार, दोघे जखमी

धुळे-सोलापूर महामार्गावरील भीषण अपघात



पाचपीरवाडी : रस्त्याच्या बाजुला उभा केलेला नादुरुस्त पिकअप वाहनाला भरधाव कारने पाठीमागुन जोराची धडक दिली. या भीषण अपघातात पिकअपमधील एक जण जागीच ठार, तर दोन जण जखमी झाले आहेत. ही घटना धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मलकापूर (ता. खुलताबाद) शिवारात रविवारी (दि. २५) दुपारी साडेतीन वाजता घडली.

आकाश पुंजाराम सातदिवे (वय २६, रा. चिंचोली, ता. खुलताबाद) असे मयताचे नाव आहे. तर हिरालाल कचरू सातदिवे (वय ५०) आणि ज्ञानेश्वर बळवंत बोडके (वय ३८, तिघेही रा. चिंचोली) हे दोघे जखमी आहेत.

चिंचोली येथून पिकअप(एमएच २० जीसी २३३४)मध्ये सोयाबीन घेऊन आकाश सातदिवे, हिरालाल सातदिवे व ज्ञानेश्वर बोडके हे लासूर स्टेशन येथील मार्केटमध्ये रविवारी निघाले होते. दरम्यान महामार्गावर मलकापूर शिवारात त्यांचे पिकअप नादुरुस्त झाल्याने त्यांनी ते रस्त्याच्या कडेला उभे करुन दुपारी साडेतीन वाजता तिघेही टायर बदलत होते. दरम्यान वेरूळकडून पाचपीरवाडी फाट्याकडे जात असलेल्या भरधाव कार(एमएच ५७,१३१३)ने पाठिमागून त्यांच्या पिकअपला जोराची धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, या अपघातात आकाश सातदिवे हा तरुण जागीच ठार झाला. तर हिरालाल सातदिवे व ज्ञानेश्वर बोडके हे दोघे किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिस केंद्र खुलताबादच्या सपोनि. विद्या झिरपे, हवालदार विनोद तांगडे, शरद दळवी व शांताराम सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने मयत व जखमींना तातडीने वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. तसेच अपघातग्रस्त वाहने बाजूला करून महामार्गावरील विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. याप्रकरणी शिल्लेगाव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोनि. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद बिघोत हे करत आहे.

एकुलता एक मुलगा गेल्याने परिवारावर दुःखाचा डोंगर

चिंचोली येथील पुंजाराम सातदिवे यांचा आकाश हा एकुलता एक मुलगा होता. तो आईवडीलांना शेतात मदत करीत होता. त्याच्या अपघाती मृत्यूमुळे सातदिवे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून एकुलता एक वंशाचा दिवा विझला आहे. वेरुळ येथे शवविच्छेदन केल्यानंतर त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्याच्या पार्थिवावर सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. आकाशच्या पश्चात आई-वडील आहेत.

स्तनाच्या कर्करोगाचे वेळीच निदान महत्त्वाचे; एमजीएममध्ये 180 विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

स्तनातील असामान्य बदल ओळखण्याचे प्रात्यक्षिक; वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : स्तनाच्या कर्करोगाचे वेळीच निदान झाल्यास उपचारासाठी मदत होऊ शकते. त्यामुळे स्तनांच्या आरोग्याविषयी जागरूक राहणे, असामान्य बदल ओळखणे आणि लक्षणे जाणवल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचे स्तनाच्या कर्करोगावरील शस्त्रक्रिया व पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ डॉ. आशुतोष तोंडारे यांनी केले.



स्तनाच्या कर्करोग जनजागृती महिन्यानिमित्त एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसच्या मेडिकल रेडिओलॉजी अँड इमेजिंग टेक्नॉलॉजी विभागातर्फे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्तनांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, स्तनांमध्ये जाणवणाऱ्या गाठी, आकारातील बदल किंवा इतर असामान्य लक्षणे कशी ओळखावीत, याविषयी डॉ. तोंडारे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. अशा प्रकारचे बदल जाणवल्यास दुर्लक्ष न करता वैद्यकीय तपासणी करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात स्तन तपासणीच्या प्रतिकृतीच्या साहाय्याने प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांना स्तन तपासणीविषयी प्रात्यक्षिक स्वरूपात माहिती मिळाली. विविध जनजागृतीपर उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यात आला. स्तनाच्या आरोग्याविषयी अचूक माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

'जाणा, स्पर्शातून ओळखा, लक्षणे ओळखा आणि कृती करा' या संकल्पनेतून स्तनांच्या आरोग्याबाबत जागरूकता आणि वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्याचा संदेश देण्यात आला.एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसचे प्राचार्य डॉ. संजय गुट्टेतवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. विभागाच्या प्राध्यापिका निशा पी. गोविंदानी आणि ऋतुजा उकिर्डे यांनी संयोजन केले. सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडला.

डिजिटल बँकिंगमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल देवगिरी बँकेचा गौरव

अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान; आधुनिक बँकिंग सेवांची दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डिजिटल बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी नागरी सहकारी बँक लि.चा गौरव करण्यात आला. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील हॉटेल वेस्टिनमध्ये आयोजित सोहळ्यात अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते बँकेला पुरस्कार प्रदान करण्यात आला.



बँकेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे आणि संगणक विभाग प्रमुख अनिल सुतवणे यांनी पुरस्कार स्वीकारला.

या सन्मानामुळे बँकेच्या डिजिटल बँकिंग क्षेत्रातील कामगिरीला प्रोत्साहन मिळाले आहे. भविष्यातही ग्राहकांना अद्ययावत तंत्रज्ञानाधारित सेवा देण्याचा बँकेचा मानस आहे. या यशाबद्दल बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ग्राहकांना सुरक्षित, सुलभ आणि आधुनिक डिजिटल बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बँकेने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. बँकिंग व्यवहार अधिक सोयीस्कर, गतिमान आणि सुलभ करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली.

राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेसाठी संभाजीनगरच्या मुलींची निवड चाचणी 1 नोव्हेंबरला

19 वर्षांखालील मुलींसाठी मातोश्री रमाई आंबेडकर हायस्कूलमध्ये आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ४८ व्या राज्यस्तरीय ज्युनियर (१९ वर्षांखालील) मुलींच्या हँडबॉल स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघाची निवड चाचणी रविवार, १ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता सिडको येथील मातोश्री रमाई आंबेडकर हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धा १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान सातारा जिल्ह्यातील वाई-पाचगणी रोडवरील ज्ञानदीप स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्हा संघात स्थान मिळविण्याची संधी मुलींना उपलब्ध झाली आहे.

निवड चाचणीसाठी खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २०१० या कालावधीत झालेला असणे आवश्यक आहे. वयाच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, जन्म दाखला किंवा शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत आणावे लागणार आहे.

महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, सहसचिव पंकज भारसाखळे आणि स्टीयरिंग कमिटीचे अध्यक्ष अजिंक्य सावे यांनी पात्र खेळाडूंनी निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष आमदार श्रीकांत जोशी व सचिव डॉ. सत्यजित पगारे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनीही पालक, क्रीडा शिक्षक आणि प्रशिक्षकांनी गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले आहे.

निवड चाचणीच्या अधिक माहितीसाठी जिल्हा असोसिएशनचे सचिव डॉ. सत्यजित पगारे यांच्याशी ९६९९८८०७९३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वाईट गुणांचा त्याग करून वाल्मीकी व्हावे : अविनाश गलांडे

जिल्हा परिषदेत महर्षी वाल्मीकी जयंती साजरी; चांगले विचार व गुण दैनंदिन आचरणात आणण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्यातील वाईट गुणांचा त्याग करून चांगले गुण आत्मसात करावेत. कामकाजात सुधारणा करून सकारात्मक विचारांनी जनसेवा करावी, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी केले.



जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे सोमवारी (दि. २६) महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, अर्थ व बांधकाम समितीचे सचिन गरड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

महर्षी वाल्मीकी यांनी वाईट कर्मांचा त्याग करून जीवनात परिवर्तन घडविले. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही स्वतःमधील उणिवा दूर कराव्यात, चांगले गुण अंगीकारावेत आणि कामकाजात सकारात्मक बदल घडवून आणावेत, असे गलांडे म्हणाले.

यावेळी बालाजी सोनटक्के, सचिन गरड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनीही महर्षी वाल्मीकी यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. त्यांचे विचार आणि चांगले गुण दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संघरत्न सरोदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी (योजना) राकेश साळुंके, समाजकल्याण अधिकारी आरावत, कार्यकारी अभियंता धनके यांच्यासह विविध विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता साळुंके यांनी केले, तर डॉ. मंगल पांचाळ यांनी आभार मानले.

वारसास्थळांचे अचूक दस्तावेजीकरण करा; जागतिक पर्यटनाच्या नकाशावर गावे आणण्यासाठी प्रयत्न करा!

मराठी भाषा तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांची वालूर, हतनूर येथील ऐतिहासिक स्थळांना भेट

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करून त्याचे अचूक व सविस्तर दस्तावेजीकरण करणे ही काळाची गरज आहे. स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेऊन वारसास्थळांचे योग्य नियोजन करावे. या कामासाठी सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुरातत्त्व विभागाकडून सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन मराठी भाषा तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

डॉ. कुलकर्णी यांनी आज सेलू तालुक्यातील वालूर व हतनूर येथे भेट देऊन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसास्थळांची पाहणी केली. यावेळी वालूर



येथील बारव, हतनूर येथील बारव तसेच चालुक्यकालीन हेमाडपंथी मंदिराची पाहणी करून त्यांनी तेथील ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले.

वारसास्थळांच्या जतनासाठी ग्रामस्थांचे कौतुक

हतनूर येथील ग्रामस्थांनी ऐतिहासिक वारसास्थळांचे जतन करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे डॉ. कुलकर्णी यांनी विशेष कौतुक केले. गावातील ऐतिहासिक वास्तू, बारव आणि मंदिरांची वैशिष्ट्ये अभ्यासण्यासाठी देश-विदेशातील संशोधक येऊ शकतात. या स्थळांचे महत्त्व योग्य प्रकारे अधोरेखित करून त्यांचे शास्त्रीय पद्धतीने दस्तावेजीकरण केल्यास वालूर व हतनूर ही गावे भविष्यात जागतिक पर्यटनाच्या नकाशावर येण्याची संधी निर्माण होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

हतनूर येथे जिल्ह्यातील पहिले 'पुस्तकाचे गाव' म्हणून नोंद निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबतही डॉ. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. गावाचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वारसा जतन करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा. उपलब्ध माहिती, ऐतिहासिक संदर्भ आणि परंपरांचे संकलन करून त्याची अचूक नोंद ठेवावी. ग्रामस्थांनी आपापल्या जबाबदाऱ्या ओळखून नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास या वारसास्थळांच्या संवर्धनाला निश्चितच गती मिळेल, असे त्यांनी सांगितले.

या कामाचा शासनस्तरावर योग्य पाठपुरावा करण्यासाठी संबंधित विभाग सहकार्य करतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी गटविकास अधिकारी उदय जाधव, वारसा समितीचे सदस्य मल्हारीकांत देशमुख, अनिल स्वामी, अनिल बडगुजर, नागेश जोशी, पोलीस पाटील रामचंद्र पारवे, सरपंच महेंद्र गाडे, मंदिर समितीचे सदस्य दत्तराव आंधळे, ॲड. गोविंदराव शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. नागेश्वर मंदिराच्या सभामंडपात डॉ. कुलकर्णी यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

मल्लखांब स्पर्धेसाठी सिद्धांत रणदिवेची अखिल भारतीय स्तरावर निवड

शिवछत्रपती महाविद्यालयाचा सिद्धांत रणदिवे राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी पात्र

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवछत्रपती महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाविद्यालयाचा खेळाडू सिद्धांत रणदिवे याची राजस्थानमधील कोटा विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला नवी झळाळी मिळाली आहे.



मल्लखांब या पारंपरिक भारतीय खेळात कौशल्य, शारीरिक क्षमता, संतुलन आणि सातत्यपूर्ण सरावाला विशेष महत्त्व आहे. या स्पर्धेसाठी निवड झाल्याने सिद्धांतला राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे.

सिद्धांत रणदिवे याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. पाटील, उपप्राचार्य डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य भरत वहाटूळे, पर्यवेक्षक डॉ. अश्रुबा गवळी, क्रीडा विभागप्रमुख डॉ. अर्चना कोल्हे आणि प्रा. किशोरी हिवर्डे यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच आगामी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा देत त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911